ePaper


# नवी मुंबईत गणेश नाईकांचा डंका; एकनाथ शिंदेंना मोठा झटका


| वर्ष - 9 | अंक -144 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™


## आतील पानांत
- रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची हॅट्रीक!
- श्रेयस अय्यरला लॉटरी लागली!
- अमेरिका व्यापार करार होणार नाही?
- जगात आणखी एक युद्ध पेटणार?


www.mahaenews.com | शनिवार, दि. 17 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





| | | काँग्रेस+ | राष्ट्रवादी | इतर |
|---|---|---|---|---|
| ११६ | ७२ | २४ | ३ | १० |



। पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होताच महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या निवडणुकांत भारतीय जनता पक्षाने (भाजपा) अभूतपूर्व यश मिळवत शहरी राजकारणावर आपले वर्चस्व ठामपणे प्रस्थापित केले आहे. मुंबईसह तब्बल २१ महानगरपालिकांवर भाजपचा झेंडा फडकला असून, शिवसेना, काँग्रेस आणि इतर पक्षांना मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, मुंबईतील तब्बल २५ वर्षांची शिवसेनेची सत्ता भाजपने हिसकावून घेतली, त्यामुळे 'ठाकरेंचा बालेकिल्ला' उद्ध्वस्त झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



### मुंबई महापालिका

| 227/227 | |
|---|---|
| भाजप | 89 |
| शिवसेना | 29 |
| राष्ट्रवादी | 03 |
| कॉंग्रेस | 24 |
| राष्ट्र. (श.प) | 01 |
| ठाकरे | 65 |
| मनसे | 06 |
| इतर | 10 |

# मुंबईत ठाकरेंचा बालेकिल्ला उदध्वस्त!

## चांदा ते बांदा 'भाजप लाट'; महापालिका निवडणुकांत ऐतिहासिक महा-विजय

### भाजपचा शहरी राजकारणात धुमाकूळ

या निवडणुकांमध्ये भाजपने केवळ संख्यात्मक विजय मिळवला नाही, तर राज्याच्या शहरी राजकारणाची दिशा बदलून टाकली आहे. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक यांसारख्या प्रमुख महानगरपालिकांमध्ये भाजपने सत्ता कायम राखत किंवा नव्याने काबीज करत विरोधकांना धूळ चारली आहे.

विशेषतः मुंबईतील विजय हा भाजपसाठी ऐतिहासिक मानला जात असून, यामुळे राज्यातील सत्तासमीकरणांवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. २१ महापालिकांवर भाजपची सत्ता

भाजपने ज्या महानगरपालिकांमध्ये सत्ता मिळवली आहे, त्यामध्ये मुंबई, नवी मुंबई,



मीरा-भाईंदर, उल्हासनगर, पनवेल, पुणे, पिंपरी-चिंचवड, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, अकोला, अमरावती, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर (अहमदनगर), जालना, नांदेड-वाघाळा आणि छत्रपती संभाजीनगर यांचा समावेश आहे. या विजयामुळे 'चांदा ते बांदा भाजप' ही घोषणा प्रत्यक्षात उतरल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाची छाप

या ऐतिहासिक विजयामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाची मोठी भूमिका असल्याचे राजकीय विश्लेषक सांगतात. शहरी विकास, पायाभूत सुविधा, वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि डिजिटल प्रशासन यांसारख्या मुद्द्यांवर भाजपने केलेले काम मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात पक्ष यशस्वी ठरला. प्रत्येक शहरातील स्थानिक प्रश्नांचा अभ्यास करून आखलेली रणनीती, बूथस्तरीय नियोजन, संघटनात्मक ताकद आणि प्रभावी प्रचारामुळे भाजपला हा महाविजय साधता आला.

### शिवसेनेला मोठा धक्का, मात्र ठाणे-कळवा किल्ला अबाधित

मुंबई गमावल्यामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसला असला, तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ठाणे आणि कल्याण-डोंबिवली या आपल्या पारंपरिक बालेकिल्ल्यांवर वर्चस्व टिकवून ठेवले आहे.

### काँग्रेसचे मर्यादित यश

काँग्रेस पक्षाला या निवडणुकांत अपेक्षित यश मिळाले नसले, तरी लातूर आणि भिवंडी-निजामपूर येथे त्यांनी स्वबळावर सत्ता मिळवली आहे. तसेच चंद्रपूर येथे शिवसेना (उबाठा) सोबत आघाडी करून सत्ता स्थापन करण्यात काँग्रेसला यश आले आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या गटाला परभणी महानगरपालिकेत काँग्रेसच्या पाठिंब्याने सत्ता मिळवता आली आहे. मात्र, एकूण निकाल पाहता काँग्रेस आणि उबाठा गटासाठी ही निवडणूक फारशी समाधानकारक ठरलेली नाही.

### बहुजन विकास आघाडीची वसई-विरारमध्ये पकड

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये पराभवाचा सामना केल्यानंतर, बहुजन विकास आघाडी (बविआ) साठी वसई-विरार महापालिका निवडणूक अत्यंत महत्त्वाची होती. या निवडणुकीत बविआने आपले अस्तित्व टिकवत वसई-विरार महापालिकेवर पुन्हा एकदा पकड मजबूत केली आहे.

स्थानिक नेतृत्व आणि प्रादेशिक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे बविआला हा विजय मिळाल्याचे मानले जात आहे.

## राज्यात 'भाजप युग' सुरू?

एकूणच, २९ महानगरपालिकांच्या निकालांनी महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे चित्र दिसत आहे. मुंबईसारखा बालेकिल्ला जिंकून, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह प्रमुख शहरांमध्ये सत्ता कायम ठेवत भाजपने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या निकालांनंतर राज्यात 'भाजप युग' सुरू झाले आहे का? हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत असून, येणारा काळ महाराष्ट्राच्या राजकारणासाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहे.

ePaper
**मुंबई ते नाशिकपर्यंत फटका, तरी काँग्रेसने लातूरचा 'गड' राखला**

| वर्ष - 9 | अंक -144 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™




www.mahaenews.com | शनिवार, दि. 17 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**महानगर पालिका निवडणूक निकाल** अजित पवारांच्या; दुहेरी धक्का स्वप्नांना सुरूंग!

# अजित पवारांवर दोन पैलवानांचा ख्वाडा

## लांडगे-मोहोळांनी 'वस्तादाला' अस्मान दाखवत पुणे-पिंपरी हिसकावली

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होताच महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. या निकालांनी अनेक नेत्यांची स्वप्नं उद्ध्वस्त केली असून काहींच्या राजकीय ताकदीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. विशेषतः उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी ही निवडणूक अत्यंत धक्कादायक ठरली आहे. मोठी तयारी, प्रचंड दौरे, आक्रमक भाषणं, थेट आव्हानं आणि सगळी ताकद पणाला लावूनही अजित पवार गटाला एकाही महानगरपालिकेत एकहाती सत्ता मिळवता आलेली नाही.**



राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी तब्बल २१ महानगरपालिकांवर भाजपने आघाडी घेतली असून अनेक ठिकाणी स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. काँग्रेस हा राज्यातील दुसरा मोठा पक्ष ठरला असून मित्रपक्षांच्या मदतीने काँग्रेसने तीन महापालिकांवर सत्ता मिळवली आहे. मात्र सर्वात मोठा फटका बसला तो अजित पवार गटाला. इतक्या मोठ्या राजकीय ताकदीच्या दाव्यानंतरही अजित पवार गटाला एकाही महापालिकेत स्वबळावर विजय मिळवता आला नाही.

### पुणे-पिंपरीवर लक्ष; पण इथेच बसला धक्का

महापालिका निवडणुकांची घोषणा झाल्यापासून अजित पवार पुणे जिल्ह्यात ठाण मांडून बसले होते. पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या त्यांच्या प्रतिष्ठेच्या लढाया ठरल्या होत्या. या दोन्ही महापालिकांवर विजय मिळवण्यासाठी त्यांनी सगळी ताकद पणाला लावली होती. इतकंच नव्हे तर सत्तेसाठी त्यांनी शरद पवार गटासोबतही युती केली होती. मात्र निकालांनी अजित पवारांच्या सगळ्या गणितांवर पाणी फेरलं.

या दोन महापालिकांमध्ये अजित पवारांना पराभवाचा सामना करावा लागला आणि हा पराभव कुणी साधासुधा नव्हे, तर दोन राजकीय पैलवानांनी 'ख्वाडा डाव' टाकून दिला.

### दोन पैलवान – एक वस्ताद, आणि राजकीय पलटी

हे दोन पैलवान म्हणजे पिंपरी-चिंचवडमधील महेश लांडगे आणि पुण्यातील मुरलीधर मोहोळ. अजित पवारांनी या दोघांनाही थेट आव्हान दिलं होतं. महेश लांडगे यांच्याबाबत तर अजित पवारांची भाषा अत्यंत आक्रमक होती. "नासका आंबा, भारंदाज डाव टाकून फिरवून फेकून दिला नाही तर पवारांची औलाद नाही," असं विधान अजित पवारांनी केलं होतं. एवढंच नव्हे तर त्यांनी लांडगे यांच्यावर पालिकेत भ्रष्टाचाराचे आरोप करत, "मी ठरवलं तर एखाद्याचा कार्यक्रम करतो," असंही खुलेआम सांगितलं होतं.

### लांडगेंचा पलटवार – 'बांगड्या घातल्या नाहीत!'

अजित पवारांच्या या विधानांना महेश लांडगे शांत बसले नाहीत. त्यांनीही तितक्याच आक्रमक शब्दांत प्रत्युत्तर दिलं. "१९९१ साली तुला कोण ओळखत होतं? चुलते नसते तर तुला कोण ओळखलं असतं? तू कार्यक्रम करतोस म्हणतोस, तर मी काय बांगड्या घातल्या आहेत का? आमच्या लाडक्या रणरागिणी – म्हणजेच लाडक्या बहिणी – तुझा कार्यक्रम करतील," असा घणाघात लांडगेंनी केला होता.

या वाक्यांनी निवडणुकीच्या रणधुमाळीत खळबळ उडाली होती. आणि निकालांनी सिद्ध केलं की, लांडगेंनी केवळ शब्दांत नव्हे तर मतपेटीतूनही अजित पवारांना चोख उत्तर दिलं.

### मुरलीधर मोहोळांची पुण्यात बाजी

दुसरीकडे पुणे महानगरपालिकेत मुरलीधर मोहोळ यांनी अजित पवारांना जबर धक्का दिला. मागील निवडणुकीत मोहोळांना हरवण्यासाठी अजित पवारांनी चंद्रकांत पाटलांशी हातमिळवणी केल्याचं बोललं जात होतं. मात्र यावेळी चित्र पूर्णपणे बदललेलं दिसलं. मोहोळांनी संघटन, रणनीती आणि भाजपच्या ताकदीच्या जोरावर पुण्यात भगवा फडकवला.

### राजकीय ताकद भाजपकडे

एकूणच या निकालांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्पष्ट संदेश दिला आहे. महानगरपालिका पातळीवर भाजपची पकड अधिक मजबूत झाली असून संघटनात्मक ताकद, स्थानिक नेतृत्व आणि आक्रमक रणनीती यामुळे भाजपने मोठी आघाडी घेतली आहे. दुसरीकडे अजित पवार गटासाठी हा आत्मपरीक्षणाचा क्षण ठरतो आहे. अजित पवारांनी पुणे जिल्ह्यावर लक्ष केंद्रित केलं, पण इथेच त्यांना सर्वात मोठा धक्का बसला. लांडगे आणि मोहोळ या दोन पैलवानांनी 'वस्तादाला' अस्मान दाखवत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका अजित पवारांच्या हातून हिसकावून घेतल्या. राजकीय आखाड्यात ख्वाडा डाव टाकण्यात हे दोन पैलवान यशस्वी ठरले – आणि महाराष्ट्राच्या राजकारणात नवा अध्याय लिहिला गेला.

**पिंपरी चिंचवड महापालिका – एकूण जागा–128**

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | 84 |
| शिवसेना | 06 |
| राष्ट्रवादी | 37 |
| काँग्रेस | 00 |
| शिवसेना (उद्धव ठाकरे)– | 00 |
| राष्ट्रवादी (शरद पवार) – | 00 |
| मनसे | 00 |
| अपक्ष | 01 |

**पुणे महापालिका – एकूण जागा–162**

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | 97 |
| शिवसेना | 06 |
| राष्ट्रवादी | 39 |
| काँग्रेस | 09 |
| शिवसेना (उद्धव ठाकरे)– | 00 |
| मनसे | 02 |
| अपक्ष | 04 |

## तुतारीचा आवाज बंद

## पुण्यात भाजपाने अजित पवारांना डिवचलं

# घड्याळ्याचे काटे उलटे फिरले!

## अजित पवार पुढे काय करणार?



। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या पुणे महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला, तर उपमुख्यमंत्री अजित पवार व ज्येष्ठ शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा युतीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. आतापर्यंतच्या निकालानुसार भाजपाने पुण्यातील १६५ पैकी तब्बल ११० जागांवर विजय मिळवून बहुमताचा आकडा पार केला आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांना केवळ २१ जागांवरच समाधान मानावे लागताना दिसून येत आहे. त्याशिवाय कॉंग्रेसचे आठ जागांवरील उमेदवार आघाडीवर आहेत.**

विशेष बाब म्हणजे- पुण्यात शिंदे व ठाकरे गटाला आतापर्यंत भोपळाही फोडता आलेला नाही. या अभूतपूर्व यशानंतर पुण्यातील स्थानिक नेत्यांनी बॅनरबाजी करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना डिवचले आहे. पुणे शहरात काढलेल्या विजयी मिरवणुकीत भाजपाचे कार्यकर्ते बॅनर घेऊन सामील झाले होते. 'ओ दादा... पुण्यात अण्णाच भारी', 'पुण्याचा धुरंधर आपला मुरलीधर', 'टांगा पलटी अन् घोडे फरार', 'घड्याळ्याचे काटे उलटे फिरले, तुतारीचा आवाज बंद', अशा आशयाचा मजकूर या बॅनर्सवर छापण्यात आला होता. यादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या पराभवावर प्रतिक्रिया दिली. जनतेचा कौल मी आदराने स्वीकर करतो, असे त्यांनी म्हटले आहे.पुण्यापाठोपाठ पिंपरी-चिंचवड महापालिकेतही भाजपाला विजय मिळाल्याने अजित पवार यांना मोठा धक्का बसला आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाला अंगावर घेण्याचा त्यांचा डाव फसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महायुती सरकारमध्ये भाजपाशी निमटूपणे जुळवून घेण्याची नामुष्की अजित पवारांवर आली आहे. एकसंध राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून बंड केल्यानंतर अजित पवारांनी भाजपाशी जुळवून घेतले होते. त्या तुलनेत एकनाथ शिंदे यांची भाजपबरोबर कुरबूर सुरू असायची; परंतु अजित पवारांनी भाजपाच्या विरोधात कधीच भूमिका घेतली नव्हती. पुणे व पिंपरी – चिंचवडमध्ये स्वबळावर लढण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करताच अजित पवारांनी वेगळी गणिते जुळवली आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी आघाडी केली. यादरम्यान प्रचारवेळी अजित पवार यांनी पिंपरी-चिंडवड येथील भाजपाच्या स्थानिक नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोपही केले होते. त्यावेळी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांना इशारा दिला होता. एकाच वेळी राज्याच्या सत्तेत भाजपाचा भागीदार तर त्याचवेळी भाजपाच्या विरोधातील राष्ट्रवादी शरद पवार गटाशी हातमिळवणी अशा दोन्ही डगरींवर अजित पवारांनी पाय ठेवला होता; परंतु या प्रतिष्ठेच्या लढाईत दोन्ही महानगरपालिकांमधील मतदारांनी अजित पवारांना सपशेल नाकारल्याचे दिसून आले. त्यांच्या मोफत बस व मेट्रो प्रवासाच्या आश्वासनाचाही फारसा फरक पडला नाही.पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेतील पराभवानंतर अजित पवार पुढे नेमके काय करणार? याचीच चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. दोन्ही महानगरपालिकांमध्ये दारुण पराभव झाल्याने अजितदादांना आता भाजपाशी निमूटपणे जुळवून घ्यावे लागणार आहे. त्यामुळे भाजपाकडून त्यांना यापूर्वी जसे सहकार्य मिळत होते, तेवढे सहकार्य मिळेलच याची काही हमी मिळेल की नाही, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. भाजपाकडून अजित पवार यांचे खच्चीकरण करण्यावर भर दिला जाईल का?

### भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप

पुणे महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला, तर उपमुख्यमंत्री अजित पवार व ज्येष्ठ शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा युतीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. आतापर्यंतच्या निकालानुसार भाजपाने पुण्यातील १६५ मिळवून बहुमताचा आकडा पार केला आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांना केवळ २१ जागांवरच समाधान मानावे लागताना दिसून येत आहे.

# पुण्यात रवींद्र धंगेकर यांच्या पत्नीचा पराभव

## सोनाली आंदेकर यांचा तुरुंगातून विजय; शिंदे गटात नाराजीचे वातावरण



। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना शिंदे गटाचे पुण्यातील फायरब्रँड नेते रवींद्र धंगेकर यांना मोठा धक्का बसला आहे. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांच्या पत्नी प्रतिभा धंगेकर यांचा पराभव झाला आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवार सोनाली आंदेकर यांनी प्रतिभा धंगेकर यांचा पराभव केला आहे.**

धंगेकर यांनी या निवडणुकीत आपली सर्व ताकद पणाला लावून दिली होती. तरीदेखील त्यांच्या पत्नीला पराभव स्वीकारावा लागल्याने शिंदे गटात नाराजीचे वातावरण पसरले आहे.पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा व शिवसेना शिंदे गटाने स्वतंत्र उमेदवार उभे केले होते, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसने शरद पवारांच्या पक्षाबरोबर युती केली होती. यादरम्यान रवींद्र धंगेकर यांनी पत्नी प्रतिभा आणि चिरंजीव प्रणव या दोघांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवून भाजपापुढे मोठे आव्हान उभे केले रहोते. भाजपाने महापालिका निवडणुकीचे प्रमुख म्हणून माजी सभागृह नेते गणेश बीडकर यांच्यावर संपूर्ण जबाबदारी सोपविली होती. मात्र, धंगेकर हे दररोज टाकत असलेल्या डावपेचांमुळे बीडकर हे शहरातील अन्य उमेदवारांच्या प्रचाराला जाण्याऐवजी आपल्याच मतदार संघात अडकून पडले असल्याचे चित्र निर्माण झाले होते.

मुलासह पत्नीला निवडून आणण्यासाठी रवींद्र धंगेकर यांनी सर्व ताकद पणाला लावून दिली होती. यादरम्यान प्रतिभा धंगेकर यांच्याविरोधात अजित पवार गटाने दिवंगत नगरसेवक वनराज आंदेकर यांची पत्नी सोनाली आंदेकर यांना उमेदवारी दिली होती.

### जनसंपर्क वाढवण्यावर भर

आयुष कोमकर यांच्या हत्या प्रकरणात सोनाली सध्या तुरुंगात आहेत. त्यांना उमेदवारी देण्यात आल्याने अनेकांनी अजित पवार यांच्या पक्षावर टीकेची झोड उठवली होती. त्याकडे दुर्लक्ष करून आंदेकर टोळीने सोनाली यांचा प्रचार सुरूच ठेवला होता. यावेळी दोन्ही महिला उमेदवारांनी आपल्या प्रभागात जनसंपर्क वाढवण्यावर भर दिला. त्याचबरोबर विकासकामांच्या मुद्द्यावरून एकमेकींना कोंडीत पकडण्याची तयारी केली.पुण्यातील पेठांमधील जुन्या वाड्यांचा प्रश्न, पाणीपुरवठा आणि स्थानिक नागरी सुविधा हे या निवडणुकीत प्रमुख मुद्दे ठरली होते.

महानगर पालिका निवडणूक : राष्ट्रवादी काँग्रेसला अवघ्या ३७ जागांवर रोखले

# पिंपरी चिंचवडमध्ये भाजपला निर्विवाद बहुमत!

## १२८ जागांपैकी ८५ जागा भाजपने जिंकल्या ; शिवसेना ६ जागांवर विजयी



। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी पार पडली. या निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी घोषित करण्यात आला. तब्बल साडेतीन वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर महापालिका निवडणूक जाहीर झाली त्यामुळे इच्छुकांची संख्या मोठी होती. निवडणुकीमध्ये ६९२ उमेदवार रिंगणात होते. या निवडणुकीत भाजपने निर्विवाद सत्ता मिळवली आहे त्यामुळे भाजप थंपिंग मेजॉरिटीने सभागृहामध्ये सत्ता स्थापन करणार आहे.**

### राष्ट्रवादीला मोठा धक्का

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीने मोठा जोर लावला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवडमध्ये तळ ठोकून राष्ट्रवादीचा जोरदार प्रचार केला. मोठ्या सोशल कॅम्पेनिंगच्या माध्यमातून भाजपाच्या कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा निवडणुकीमध्ये अधोरेखित केला. मात्र नागरिकांनी याकडे दुर्लक्ष केले असल्याचे निवडणुकीत दिसून आले. दरम्यान राष्ट्रवादीच्या २२ नगरसेवकांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश केला मात्र तरीही २०१७ मधील निकालाची आकडेवारी राष्ट्रवादीने कायम राखली. २०१७ पंचवार्षिक निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीने ३६ जागा मिळवल्या होत्या. यंदाच्या पंचवार्षिक मध्ये ही राष्ट्रवादीला आपल्या ३६ जागा कायम राखता आल्या आहेत.

### राष्ट्रवादीला लॉटरी; भाजपच्या शहराध्यक्षांना धक्का

प्रभाग क्रमांक 18 मध्ये अनपेक्षित पणे राष्ट्रवादीला लॉटरी लागली तर भाजपच्या झुंजावातामध्ये अनंत कोराळे निवडून आले तर भाजपचे सक्रिय सदस्य आणि माजी नगरसेवक असलेले मोरेश्वर शेंडगे हे मोठ्या मताधिक्याने पडले. मोरेश्वर शेंडगे यांच्या तिकिटासाठी आग्रह धरलेल्या भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांना हा धक्का मानला जात आहे.

### कमी फरकाने जिंकलेले उमेदवार

-प्रभाग 19 क मधून राष्ट्रवादीचे उमेदवार सविता आसवानी 20 मतांनी विजयी, भाजपचे जयश्री गावडे पराभूत

-प्रभाग 19 ड मधून भाजपचे मंदार जगताप 323 मतांनी विजयी, राष्ट्रवादीच्या काळुराम पवार यांचा पराभव

-प्रभाग 8 अ मधून सीमा सावळे 256 मतांनी पराभव, भाजप उमेदवार कांबळे विजयी

-प्रभाग 27 ड मधून राष्ट्रवादीचे सागर कोकणे 600 मतांनी विजयी, भाजप उमेदवार चंद्रकांत नखाते यांचा पराभव

### माजी नगरसेवकांना पराभवाचा धक्का

या निवडणुकीमध्ये माजी नगरसेवकांना नागरिकांनी सपशेल नाकारले असल्याचे दिसून आले. यामध्ये दोन शहराध्यक्ष, ५ माजी स्थायी समिती अध्यक्ष, दोन माजी नगरसेवक पती-पत्नी यांच्यासह २५ हून अधिक नगरसेवकांना नागरिकांनी घरचा रस्ता दाखवला आहे. यामध्ये माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी स्थायी समिती अध्यक्ष अतुल शितोळे, संतोष लोंढे सीमा सावळे, विलास मडिगेरी उषा वाघिरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष तुषार कामठे, मनसेचे सचिन चिखले, आपचे रविराज काळे, याशिवाय उषा मुंडे, मोरेश्वर भोंडवे, शितल काटे, मोरेश्वर भोंडवे, अश्विनी जाधव, लक्ष्मण सस्ते बाळासाहेब ओव्हाळ, नारायण बहिरवडे, मीनल यादव, काळूराम पवार, चंद्रकांता सोनकांबळे या माजी नगरसेवकांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

## माजी नगरसेवकांना नागरिकांनी सपशेल नाकारले

या निवडणुकीमध्ये माजी नगरसेवकांना नागरिकांनी सपशेल नाकारले असल्याचे दिसून आले. यामध्ये दोन शहराध्यक्ष, ५ माजी स्थायी समिती अध्यक्ष, दोन माजी नगरसेवक पती-पत्नी यांच्यासह २५ हून अधिक नगरसेवकांना नागरिकांनी घरचा रस्ता दाखवला आहे. यामध्ये माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी स्थायी समिती अध्यक्ष अतुल शितोळे, संतोष लोंढे सीमा सावळे, विलास मडिगेरी उषा वाघिरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष तुषार कामठे, मनसेचे सचिन चिखले, आपचे रविराज काळे, याशिवाय उषा मुंडे, मोरेश्वर भोंडवे, शितल काटे, मोरेश्वर भोंडवे, अश्विनी जाधव, लक्ष्मण सस्ते बाळासाहेब ओव्हाळ, नारायण बहिरवडे, मीनल यादव, काळूराम पवार, चंद्रकांता सोनकांबळे या माजी नगरसेवकांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.



## भूमिका

# पिअर द कुबर्तांनी दिलेले विश्वभान!

**पॅरिसमधल्या फ्रेंच अॅथलेटिक स्पोर्ट्स संस्थेच्या सभेत, नोव्हेंबर १८९२मध्ये भाषणाच्या सुरुवातीलाच पिअर द कुबर्ता जे काही बोलले ते ऐकून उपस्थितांस काय प्रतिक्रिया द्यायची हे क्षणभर कळलेच नाही. थोडी चुळबुळ, थोडी कुजबुज झाली. पण पिअरना म्हणायचे काय ते याचा बोध होत नव्हता.**

पिअर म्हणाले : "आता अॅथलेटिक्सबद्दल बोलायचं झालं, तर पुढे काय होईल ते ठाऊक नाही. पण त्याच्या दोन नवीन पैलूंविषयी मला तुमच्यासमोर मत मांडावंच लागेल. यात लोकशाही मूल्य आहे आणि आंतरराष्ट्रीयत्व सामावलेलं आहे. पहिल्या पैलूमुळे याचं भवितव्य सुनिश्चित होईल. सध्याच्या काळात (१८९२!) ज्यात लोकशाही मूल्य नाही ते टिकणारच नाही. दुसऱ्या पैलूविषयी विचाराल तर अनेक कवाडं खुली होतील असा मला विश्वास वाटतो. आपल्याकडील रोव्हर, धावपटू, तलवारबाज बाहेर धाडता येतील. हा भविष्यातला मुक्त व्यापार आहे. युरोपमध्ये शांतता नांदण्याच्या दृष्टीनं हे महत्त्वाचं आहे." उपस्थितांना कळो ना कळो, पण पिअर द कुबर्तांना ते काय बोलत होते याची पूर्ण कल्पना होती. आधुनिक ऑलिम्पिक स्पर्धांच्या आयोजनाविषयी त्यांच्या डोक्यात इतकी वर्षे जे काही संचित जमले होते त्याची सार्वजनिक वाच्यता त्यांच्याकडून पहिल्यांदाच त्या सभेच्या निमित्ताने झाली. ते धावपटू, तलवारबाज इतर देशांमध्ये पाठवण्याविषयी बोलले. तो काळ त्यांच्या दृष्टीने युद्धोत्तर शांततेचा – १८७०मधील फ्रँको-प्रशियन युद्धाची समाप्ती होऊन दोन दशकनंतरचा-होता. इतर देशांमध्ये सैनिक धाडून रक्तपात घडवण्यापेक्षा खेळाडू पाठवलेले काय वाईट, हे त्यांना अभिप्रेत असावे. हाच धागा पकडून त्या भाषणात ते पुढे सांगतात :म्हणूनच मला दुसऱ्या पैलूविषयी मी काय ठरवलं ते सांगायचंय. या माझ्या मोहिमेत तुमच्याकडून सहकार्य मिळेल, जसं ते आतापर्यंत नेहमीच मिळत आलं. परिस्थिती अनुकूल असेल तर मला माझं उदात्त, भव्य स्वप्न साकारण्याची संधी मिळेल. ते स्वप्न आहे... ऑलिम्पिक खेळांच्या पुनर्स्थापनेचं!"



पिअर उत्स्फूर्तपणे काहीही तयारी न करता ऑलिम्पिकविषयी – म्हणजे आधुनिक ऑलिम्पिकच्या पुनरुज्जीवनाविषयी – बोलून गेले असे त्या वेळी तिथल्या बहुतांना वाटले होते. पण ऑलिम्पिकचा हा किडा त्यांच्या मेंदूत गेली काही वर्षे वळवळत होता. यापूर्वी किमान दोन वेळा – १८८८ आणि जून १८९२ मध्ये – त्यांनी अमेरिकी विद्यापीठांशी सामूहिक क्रीडास्पर्धांबद्दल केलेल्या पत्रव्यवहारात आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक खेळांचा उल्लेख केला होता. अशा सामूहिक क्रीडास्पर्धांचा सर्वोत्तम सुंदर आविष्कार म्हणजे ऑलिम्पिक. प्राचीन ग्रीसमध्ये ख्रिस्तपूर्व काळात कित्येक वर्षे ऑलिम्पिया गावात नागरिक मोठ्या संख्येने एकत्र जमायचे ते निव्वळ खेळण्यासाठी. एरवी असे एकत्र येणे लग्नसमारंभ, अंत्यविधी, किंवा युद्धास निघण्यापूर्वी सैनिकी जमवाजमवीच्या निमित्तानेच व्हायचे. पण खेळासाठी कुणी एकत्र यायचे ही कल्पनाच अभूतपूर्व होती. प्राचीन ग्रीसमध्ये हे कित्येक वर्षे सुरू होते, हेही सांस्कृतिक प्रगतीचे लक्षण मानता येईल. किमान पिअर द कुबर्ता यांना तसे वाटायचे. फरक इतकाच की ग्रीसमधील त्या स्पर्धांचे स्वरूप पूर्णपणे स्थानिक असे होते. आसपासच्या गावांतून, क्वचित प्रसंगी प्रांतांमधून मंडळी जमायची. सगळे पुरुषच. बहुतेक सगळे खेळताना नागवेच. पिअरना या संकल्पनेला आधुनिक आणि आंतरराष्ट्रीय स्वरूप द्यायचे होते. शार्ल पिअर द फ्रेडी बारॉन द कुबर्ता यांचा जन्म १ जानेवारी १८६३ रोजी एका सधन फ्रेंच उमराव कुटुंबात झाला. ते लहानाचे मोठे झाले तो काळ फ्रान्समध्ये मोठ्या उलथापालथीचा होता. फ्रँको प्रशियन युद्ध (१८७०), त्या युद्धात एकत्रित जर्मनीकडून फ्रान्सचा झालेला मानहानीकारक पराभव, फ्रेंच क्रांतिकारकांकडून देशाचा ताबा, मग लोकशाहीवादी सरकारची स्थापना... इतर कोणत्याही देशात युद्धातील पराभवाबद्दल सरकारविषयी नाराजी असते, तशीच परिस्थिती त्या वेळी फ्रान्समध्ये होती. नेपोलियन बोनापार्टचे सोनेरी दिवस अनुभवलेल्या त्या देशामध्ये पराभवाची विविधांगी मीमांसा सुरू होती. बालवय, पौगंडावस्था, प्रौढावस्थेच्या संक्रमणातून जात असताना पिअर हे सारे आकळून घेत होते. काही गोष्टी त्यांच्या मनात स्पष्ट होऊ लागल्या होत्या. उदा.- युद्धाने समस्या सुटत नाहीत... अधिक शस्त्रसुसज्ज होते म्हणून नव्हे; तर शारीरिक तंदुरुस्तीच्या आघाडीवर फ्रेंचांपेक्षा कितीतरी सरस होते... शारीरिक तंदुरुस्ती निव्वळ मिलिटरी अकादम्यांमध्ये वाढवता येणार नाही. तिला जीवनशैलीचा भाग बनवायचे तर ते खेळांमधून साध्य करण्यासारखे आहे

## प्रासंगिक »

### मित्रांचे मरण!

***वास्तविक २०१७ च्या तुलनेत भाजप नगरसेवकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असे नाही. पण विरोधकांचे तसेच सहकारी पक्षांचे लक्षणीय नुकसान भाजप करू शकला...***

सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मन:पूर्वक अभिनंदन. त्याची प्रमुख कारणे दोन. एक म्हणजे त्यांनी विरोधकांशी एकहाती दोन हात केले आणि त्याच वेळी दिल्लीतील आपले पक्षश्रेष्ठी ज्यांचे समर्थन करत होते ते किती अयोग्य आणि अस्थानी आहे हे त्यांनी दाखवून दिले. या दोहोंतील पहिल्यापेक्षा दुसरे अधिक महत्त्वाचे. कारण तसेही विरोधक गलितगात्रच होते. फडणवीस यांनी त्यांना मरणासन्न केले. दुसरे अधिक महत्त्वाचे कारण त्या मुद्द्यावरील लढाई ही बाहेर दिसणारी नाही. ती फडणवीस यांना एकट्याने करावी लागली. तीत त्यांना साथ होती ती रा. स्व. संघाची. म्हणजे विधानसभा निवडणुकीप्रमाणे ही निवडणूकही फडणवीस यांनी स्वत:च्या जिवावर लढवली आणि विजय मिळवून दाखवला. यामुळे त्यांचे दिल्लीतील वजन- आणि अर्थातच प्रतिस्पर्धीही- वाढणार हे उघड. असो. त्याविषयी नंतर.

जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात दहशतवाद्यांनी भारतीय हवाई दलाच्या वाहनांवर गोळीबार केला. या दहशतवादी हल्ल्यात पाच जवान जखमी झाले, त्यापैकी एकाला हौतात्म्य आले. राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या पीर पंजाल भागात गेल्या पंधरवड्यात, २२ एप्रिल व २८ एप्रिल रोजीही दहशतवादी हल्ले घडले होते.

# हल्ले होणार नाहींत, असे उपाय हवे

पण त्यांचे लक्ष्य स्थानिक अधिकारी अथवा कर्मचारी हे होते. आपल्या देशात चालू असलेल्या लोकशाही प्रक्रियेला बाधा आणण्याच्या प्रयत्नाला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी आपले हवाई दल सक्षम आहेच. पण २०२१ पासून सुरू झालेल्या घटनांमध्ये आतापर्यंत २१ जवानांचा बळी गेला आहे आणि अनेक जवान जखमी झाले आहेत. भरून न येणारे हे मोठे नुकसान कसे कमी करता येईल यासाठी कायमस्वरूपी उपाय केले पाहिजेत. कर्नाटकचे विद्यामान खासदार प्रज्ज्वल रेवण्णा यांनी महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे ध्वनिचित्रमुद्रण उपलब्ध आहे. तरीही सीतारामन यांनी 'विरोधक याचे राजकारण करत आहेत,' असे म्हणणे दुर्दैवी आहे. यात कसले राजकारण आहे, हे सीतारामन यांनीच सांगावे. महिलांवरील लैंगिक अत्याचार ही दुर्लक्ष करण्यासारखी बाब नसून, तो अक्षम्य गुन्हा आहे. कुस्ती प्रशिक्षक ब्रजभूषण सिंह असो प्रज्ज्वल रेवण्णा, सारे एकाच माळेचे मणी ठरतात. त्यातही भाजपच्या



कोणीही गुन्हा करावा, सरकार नेहमीच त्यांना पाठीशी घालत आले आहे-याउलट विरोधकांनी कोणताही गुन्हा केला की, त्यांच्याविरुद्ध तत्परतेने कारवाई करून, त्यांना तुरुंगात टाकायचे, यातून 'कायद्यापुढे सारे समान' या घटनात्मक तत्त्वाचे काय पालन होते? हासुद्धा गोबेल्स नीतीचाच भाग नाही का? कारण यापूर्वी या सदरात लेखक विशेषत: अर्थविषयक प्रश्नांविषयी मत मांडत. जीएसटीवर टीका-टिप्पणी करणे, हा तर त्यांचा आवडता विषय. परंतु याविषयीच्या ताज्या वृत्तांकडे त्यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. एप्रिल २०२४ मधील जीएसटी महसूल संकलन आतापर्यंतचे सर्वाधिक २.१० लाख कोटी रुपये आहे, त्यातही पाच-सहा छोट्या राज्यांची अल्पशी घट वगळता उर्वरित राज्यांची महसुली उत्पन्न २५ टक्क्यांच्या पुढेच आहे. या पद्धतीने महसूल संकलन होत राहिल्यास सरकारच्या एकूण महसुलात जीएसटीचा वाटा ४० टक्क्यांच्या आसपास राहिला आहे. गेल्या दोन-तीन वर्षांच्या शेअर बाजारातील चढता क्रमसुद्धा देशाच्या अर्थव्यवस्थेतील आत्मविश्वास वाढवत आहे. एवढे सारे वास्तववादी असूनदेखील, लेखक या वृत्तांची दखल न घेता, केवळ जाहीरनाम्यावर चार चार लेख लिहीत असतील तर हासुद्धा एक प्रकारे गोबेल्स नीतीचाच भाग असू शकतो. भाजपचा अभिमान' हा 'समोरच्या बाकावरून'मधील लेख वाचून खूपच मनोरंजन झाले. अल्पसंख्याक लांगूलचालनासाठी जगप्रसिद्ध असणाऱ्या काँग्रेसने आम्ही 'मुस्लीम' हा शब्दच वापरला नाही म्हणणे म्हणजे जणू जनतेला अल्पसंख्याक म्हणजे कोण ते माहीतच नसल्यासारखे बोलणे होय.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## संभाजीनगरमध्ये भाजपाला बहुमत

## अंबादास दानवेंबाबत खैरे काय म्हणाले?

# ठाकरे संपले म्हणणाऱ्यांना थप्पड

## युतीला निर्विवाद बहुमत मिळाले

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या मुंबई महापालिकेचा निकाल अखेर शुक्रवारी जाहीर झाला. या निवडणुकीत भाजपा-शिंदे गटाच्या युतीला निर्विवाद बहुमत मिळाले; तर गेल्या २५ वर्षांपासून मुंबईवर वर्चस्व ठेवणाऱ्या ठाकरेंची मोठी पिछेहाट झाल्याचे दिसून आले. या अभूतपूर्व यशानंतर मुंबईत महायुतीचाच महापौर बसणार असल्याचे निश्चित झाले. यादरम्यान महापालिकेची सत्ता मिळाल्यानंतर भाजपातील नेत्यांनी आनंदोत्सव साजरा करताना ठाकरे बंधूंना डिवचण्याचे काम केले. त्यांना प्रत्युत्तर देताना ठाकरे गटाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी सूचक विधान केले.**



मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल हाती आल्यानंतर चंद्रकांत खैरे यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी भाजपासह शिंदे गटाने छत्रपती संभाजीनगरमधील आमचे अनेक पदाधिकारी फोडले होते. शहरात आमचा एकही आमदार-खासदार नसतानाही सहा नगरसेवक निवडून आले. ही निवडणूक लढवण्यासाठी आमच्या पक्षाकडे एकही रुपया नव्हता. तरीदेखील आमच्या शिवसैनिकांनी प्रामाणिकपणे निवडणूक लढवली आणि त्यातील काहीजण विजयी झाले, असे खैरे यांनी स्पष्ट केले.मुंबईसह राज्यातील काही महापालिकांचे कौल पाहता उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीने निश्चितच चांगली कामगिरी केली आहे.

त्यामुळे महाराष्ट्रातून ठाकरे संपले असे म्हणणाऱ्यांना आजच्या निकालामुळे थप्पड बसली आहे. मुंबईतही शिवसेना-मनसेच्या युतीला चांगले यश मिळाले असून आम्ही जवळपास ७२ जागांवर विजय मिळवला आहे. सध्या पक्षावर पराभवाचा परिस्थिती आली असली तरी आगामी निवडणुकांमध्ये आम्ही ती सुधारण्याचा नक्कीच प्रयत्न करू, असे खैरे यांनी म्हटले आहे.छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या प्रचारादरम्यान विधान परिषदेचे माजी विरोधीपक्षनेते अंबादास दानवे हे चार दिवस गायब होते, असा आरोप खैरे यांनी केला होता. त्याबाबत प्रश्न विचारल्यानंतर खैरेंनी महापालिकेत पक्षाला

### काय म्हणाले चंद्रकांत खैरे?

मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल हाती आल्यानंतर चंद्रकांत खैरे यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी भाजपासह शिंदे गटाने छत्रपती संभाजीनगरमधील आमचे अनेक पदाधिकारी फोडले होते. शहरात आमचा एकही आमदार-खासदार नसतानाही सहा नगरसेवक निवडून आले. ही निवडणूक लढवण्यासाठी आमच्या पक्षाकडे एकही रुपया नव्हता.

आलेल्या अपयशाला अप्रत्यक्षपणे अंबादास दानवे यांना जबाबदार धरले. अंबादास अखेरचे पाच दिवस कुठे होते? याबाबत मला काहीच माहिती नाही. निवडणुकीची रणनीती ते स्वत:आखत होते आणि आम्हाला काहीच करू देत नव्हते.

त्यांच्यामुळेच शिवसेनेला (उबाठा) पराभवाचा सामना करावा लागला. त्यांच्या भावलाही ते निवडून आणू शकले नाही, असा आरोप खैरे यांनी केला. यावेळी महापालिका निवडणुकीत काहीतरी गडबड झाल्याची शंकाही त्यांनी व्यक्त केली.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाने तब्बल ५७ जागा जिंकून जोरदार मुसंडी मारली. त्यापाठोपाठ असदुद्दीन ओवैसी यांच्या एमआयएम पक्षाने जवळपास ३३ जागा जिंकण्यात यश मिळवले. दुसरीकडे- एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षाला केवळ १२ जागांवरच समाधान मानावे लागले. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला सहा जागाच जिंकता आल्या. वंचित बहुजन आघाडीने चार जागांवर दणदणीत विजय मिळवला. अजित पवार यांच्या पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. त्याउलट काँग्रेस व शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने प्रत्येकी एका जागेवर विजय मिळाला आहे. या निकालानंतर संभाजीनगरमध्ये भाजपाचाच महापौर बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# भाजपाला पराभवाचा फटका

## ठाकरेंच्या शिवसेनेचा दणदणीत विजय, परभणी काय घडले?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई महापालिका निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवणाऱ्या भारतीय जनता पक्षाला परभणीत पराभवाचा फटका बसला आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने महापालिकेच्या निवडणुकीत दणदणीत विजय मिळवला आहे. काँग्रेसलाही अपेक्षेपेक्षा चांगल्या जागा मिळाल्याने परभणीतील सत्तासमीकरण पूर्णपणे बदलले आहे.**

विशेष बाब म्हणजे, महापालिकेत विजय मिळवण्यासाठी भाजपाने आपली संपूर्ण ताकद पणाला लावून दिली होती. तरीदेखील ठाकरे गटाला रोखण्यात त्यांना अपयश आले आहे.परभणी महापालिकेतील ६५ जागांसाठी गुरुवारी (१४ जानेवारी) मतदानाची प्रक्रिया पार पडली. शुक्रवारी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होताच कोणत्या पक्षाला यश मिळणार याचीच चर्चा संपूर्ण जिल्ह्यात रंगली होती. यादरम्यान उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने २५ जागा मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले, तर काँग्रेसने १२ जागा जिंकून आघाडी आणखीनच मजबूत केली. या निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा फटका बसला आहे. त्यांना ११ जागांवरच समाधान मानावे लागले आहे, तर भाजपाच्या पदरात केवळ १२ जागा पडल्या आहेत. त्यामुळे महापालिकेत काँग्रेस-ठाकरे गटात आघाडीची सत्ता येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.राज्यात भाजपाची विजयी घोडदौड सुरू असली तरीही परभणीकरांनी मात्र शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसच्या आघाडीला स्पष्ट बहुमत दिले आहे. विशेष बाब म्हणजे, काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटातील कोणत्याही वरिष्ठ



### भाजपाचे १२ उमेदवार विजयी

भारतीय जनता पक्षाचे दिग्गज नेते प्रचाराच्या मैदानात उतरूनही पक्षाला मोठे यश मिळू शकले नाही. महापालिकेत तब्बल ३७ जागांवर लढणाऱ्या भाजपाचे केवळ १२ उमेदवार विजयी झाले आहेत. दुसरीकडे- राष्ट्रवादी काँग्रेसकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची परभणीमध्ये भव्य सभा झाली होती.

नेत्याने परभणीमध्ये जाहीर सभा देखील घेतली नव्हती. ठाकरे गटाचे एकनिष्ठ खासदार संजय जाधव व आमदार डॉक्टर राहुल पाटील यांनी महापालिकेत प्रचाराची जबाबदारी घेतली, तर काँग्रेसकडून माजी आमदार सुरेश देशमुख, माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी प्रचार केला.परभणीत भाजपाला विजय मिळवून देण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभा घेतली होती. त्याचबरोबर महायुती सरकारमधील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही मतदानाच्या काही दिवस आधीच परभणीत तळ ठोकला होता. चव्हाण यांनीही परभणीत येऊन आपल्या पक्षातील उमेदवारांचा जोरदार प्रचार केला.

## भारताला मोठा फटका

## व्यापार करारावर सकारात्मक पद्धतीने चर्चा सुरू

# भारत-अमेरिका व्यापार करार होणार नाही?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादलेलं आहे. भारतावर देखील एकूण ५० टक्के आयात कर लादलेला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे भारताला अमेरिकेत वस्तू निर्यात करण्यासाठी आता तब्बल ५० टक्के टॅरिफ द्यावा लागत असल्यामुळे याचा मोठा फटका भारताला बसत आहे.**

## व्यापारी संबंध ताणले गेले



यातच गेल्या काही महिन्यांपासून डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने भारताच्या विरोधात वक्तव्य करत आहेत. त्यामुळे मागील काही महिन्यांपासून अमेरिका आणि भारतामधील व्यापारी संबंध ताणले गेलेले आहेत. तसेच रशियाकडून स्वस्त दरात खनिज तेलाची आयात करणाऱ्या देशाला धडा शिकविण्यासाठी अमेरिकेने तब्बल ५०० टक्के टॅरिफ आकारण्याचा इशारा दिलेला आहे. याचा फटका भारताला देखील बसण्याची शक्यता आहे, कारण भारत देखील रशियाकडून स्वस्त दरात खनिज तेलाची आयात करतो.दरम्यान, या सर्व घडामोडी सुरू असतानाच भारत आणि अमेरिकेत व्यापार करारासाठी चर्चा सुरू असल्याचं अनेकदा सांगण्यात आलं. मात्र, त्यावर अद्याप तोडगा निघू शकलेला नाही. त्यामुळे भारत आणि अमेरिकेत व्यापार करार होणार की नाही? याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचं बोललं जात आहे. मात्र, असं असतानाच आता भारत आणि अमेरिकेतील व्यापार कराराबाबत मोठी माहिती समोर आली आहे.माहितीनुसार, भारत आणि अमेरिकेतील व्यापार कराराबाबत मोठी माहिती समोर आली आहे. वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी भारत आणि अमेरिकेतील व्यापार करारावर सकारात्मक पद्धतीने चर्चा सुरू असल्याचे संकेत दिले आहेत. राजेश अग्रवाल यांनी म्हटलं की, “दोन्ही पक्षाच्या बाजूने व्यापार कराराबाबत सकारात्मक पद्धतीने चर्चा सुरू आहेत. दोन्ही बाजूच्या पक्षाना वाटत आहे की भारत आणि अमेरिकेतील व्यापार करार होईल. यासाठी सकारात्मक चर्चा सुरू आहे.”राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादलेलं आहे. भारतावर देखील एकूण ५० टक्के आयात कर लादलेला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे भारताला अमेरिकेत वस्तू निर्यात करण्यासाठी आता तब्बल ५० टक्के टॅरिफ द्यावा लागत असल्यामुळे याचा मोठा फटका भारताला बसत आहे.

यातच गेल्या काही महिन्यांपासून डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने भारताच्या विरोधात वक्तव्य करत आहेत. त्यामुळे मागील काही महिन्यांपासून अमेरिका आणि भारतामधील व्यापारी संबंध ताणले गेलेले आहेत. तसेच रशियाकडून स्वस्त दरात खनिज तेलाची आयात करणाऱ्या देशाला धडा शिकविण्यासाठी अमेरिकेने तब्बल ५०० टक्के टॅरिफ आकारण्याचा इशारा दिलेला आहे. याचा फटका भारताला देखील बसण्याची शक्यता आहे, कारण भारत देखील रशियाकडून स्वस्त दरात खनिज तेलाची आयात करतो.दरम्यान, या सर्व घडामोडी सुरू असतानाच भारत आणि अमेरिकेत व्यापार करारासाठी चर्चा सुरू असल्याचं अनेकदा सांगण्यात आलं. मात्र, त्यावर अद्याप तोडगा निघू शकलेला नाही. त्यामुळे भारत आणि अमेरिकेत व्यापार करार होणार की नाही? याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचं बोललं जात आहे. मात्र, असं असतानाच आता भारत आणि अमेरिकेतील व्यापार कराराबाबत मोठी माहिती समोर आली आहे.माहितीनुसार, भारत आणि अमेरिकेतील व्यापार कराराबाबत मोठी माहिती समोर आली आहे. वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी भारत आणि अमेरिकेतील व्यापार करारावर सकारात्मक पद्धतीने चर्चा सुरू असल्याचे संकेत दिले आहेत. राजेश अग्रवाल यांनी म्हटलं की, “दोन्ही पक्षाच्या बाजूने व्यापार कराराबाबत सकारात्मक पद्धतीने चर्चा सुरू आहेत. दोन्ही बाजूच्या पक्षाना वाटत आहे की भारत आणि अमेरिकेतील व्यापार करार होईल.

## मोठ्या प्रमाणात आयात शुल्क

यासाठी सकारात्मक चर्चा सुरू आहे.राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादलेलं आहे. भारतावर देखील एकूण ५० टक्के आयात कर लादलेला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे भारताला अमेरिकेत वस्तू निर्यात करण्यासाठी आता तब्बल ५० टक्के टॅरिफ द्यावा लागत असल्यामुळे याचा मोठा फटका भारताला बसत आहे.

# जगात आणखी एक युद्ध पेटणार?

## इराणवर हल्ल्यासाठी ट्रम्प कोणत्या शस्त्रांचा वापर करणार?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इराणमधील सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांच्याविरोधात नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. खामेनींच्या विरोधातील आंदोलनांनी आता हिंसक वळण घेतले आहे. अमेरिकेची इराणबद्दलची भूमिका अधिक कठोर होत चालली आहे.**

१९७९ च्या इस्लामिक क्रांतीपासून सत्तेत असलेल्या धार्मिक व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी देशभरातील हजारो लोक रस्त्यावर उतरले आहेत. सुरुवातीला ढासळत्या आर्थिक परिस्थितीमुळे सुरू झालेल्या या आंदोलनांचे आता व्यापक राजकीय संघर्षात रूपांतर झाले आहे.या पार्श्वभूमीवर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला आहे की, जर इराणी प्रशासनाने आंदोलकांवरील हिंसक कारवाई सुरूच ठेवली, तर अमेरिका लष्करी हस्तक्षेप करू शकते. १३ जानेवारी रोजी ट्रम्प यांनी त्यांच्या ‘ट्रुथ सोशल’ प्लॅटफॉर्मवरून इराणी आंदोलकांना थेट संबोधित केले आणि लिहिले, “इराणी देशभक्तांनो, आंदोलन सुरू ठेवा आणि मारेकरी व अत्याचार करणाऱ्यांची नावे जपून ठेवा. त्यांना मोठी किंमत मोजावी लागेल. आंदोलकांची निर्घृण हत्या थांबेपर्यंत मी इराणी



अधिकाऱ्यांबरोबरच्या सर्व बैठका रद्द केल्या आहेत.

मदत लवकरच पोहोचेल. MIGA चा अर्थ ‘मेक इराण ग्रेट अगेन’ आहे. मात्र, ही मदत नेमकी कोणत्या स्वरूपाची असेल, हे राष्ट्राध्यक्षांनी स्पष्ट केलेले नाही. या महिन्याच्या सुरुवातीलाच ट्रम्प यांनी लष्करी कारवाईचे संकेत दिले होते. “इराण नेहमीप्रमाणे शांततापूर्ण आंदोलकांची हिंसक हत्या करत असेल, तर अमेरिका त्यांच्या बचावासाठी धावून येईल,” असे सांगताना त्यांनी म्हटले की आम्ही पूर्णपणे सज्ज आहोत.” यामुळे इराणच्या सत्ताधाऱ्यांकडूनही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत आणि तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यास काय परिणाम होतील? ट्रम्प कोणत्या शस्त्रांचा वापर करू शकतात? एआय युद्धतंत्राच्या वापराची शक्यता किती? जाणून घेऊयात...ट्रम्प यांची भूमिका आक्रमक असली, तरी गेल्या वर्षीच्या १२ दिवसांच्या युद्धाच्या तुलनेत सध्या या भागात अमेरिकन सैन्याची तैनात कमी आहे . जून २०२५ मध्ये, ‘यूएसएस जेराल्ड फोर्ड’ ही जगातील सर्वात मोठी विमानवाहू युद्धनौका व्हर्जिनियाहून भूमध्यसमुद्राकडे रवाना झाली होती.

## सर्वात मोठी विमानवाहू युद्धनौका

यूएस साउदर्न कमांड’च्या ‘ऑपरेशन साउदर्न स्पीयर’ मोहिमेसाठी तैनात करण्यात आली आहे. या युद्धनौकेबरोबर असणाऱ्या युद्धनौकांचा ताफाही आता भूमध्यसमुद्रातून बाहेर पडला आहे. ऑक्टोबर २०२५ च्या विश्लेषणानुसार, ‘यूएसएस जेराल्ड फोर्ड’ला कॅरिबियनमधून पुन्हा भूमध्य समुद्रात येण्यासाठी २० नॉट (३७ किमी/तास) वेगाने साधारण १० दिवस लागतील.

# अबीर गुलालवरील बंदीनंतर, वाणी कपूर सावध

काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी मोठा दहशतवादी हल्ला झाला. यानंतर दहशतवाद्यांविरोधात देशभरातून तीव्र निषेध करण्यात आला. अनेक कलाकारांनीही सोशल मीडियामार्फत पोस्ट करीत त्यांच्या भावना व्यक्त केल्या; तर हल्ला झाल्यानंतर सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले. पाकिस्तानचे सोशल मीडिया अकाउंट भारतात बॅन करण्यात आले, तर काही दिवसांपूर्वीच काश्मीरमध्ये हल्ला झाल्यानंतर पाकिस्तानी कलाकार सहभागी असलेल्या कलाकृतींवर बंदी आणली. यासह काही दिवसांनंतर आता पाकिस्तानी कलाकारांचेही सोशल मीडिया अकाउंट भारतात बॅन केले आहेत. गेल्या काही दिवसांत पाकिस्तानी अभिनेता फवाद खान मुख्य भूमिकेत असलेल्या 'अबीर गुलाल' या चित्रपटाची बरीच चर्चा झाली होती. हा चित्रपट ९ मे रोजी प्रदर्शित होणार होता. परंतु, काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर या चित्रपटाला बॅन करण्यात आलं आहे.यामध्ये फवाद खानसह अभिनेत्री वाणी कपूरही मुख्य भूमिकेत होती. पण, चित्रपटाला बॅन करण्यात आल्याने आता वाणी कपूरने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून 'अबीर गुलाल' चित्रपटाच्या संदर्भातील सर्व फोटो व्हिडीओ डिलीट केले आहेत.'अबीर गुलाल' चित्रपटातून फवाद खान तब्बल नऊ वर्षांनी बॉलीवूडमध्ये पुनरागमन करणार होता; तर शेवटचा तो 'ए दिल है मुश्कील' या चित्रपटात झळकला होता.

# शाहरुख खान करतो घरातली कामं

आजपर्यंत शाहरुख खानने अनेक हिट सिनेमे केले. रोमँटिक, ॲक्शन आणि कॉमेडी सर्व प्रकारच्या सिनेमांमध्ये त्याने महत्त्वाच्या भूमिका केल्या. २०१८ च्या 'झिरो' चित्रपटानंतर शाहरुख खान बराच काळ चित्रपटांपासून दूर राहिला आणि चार वर्षे पूर्ण केल्यानंतर तो २०२३ मध्ये 'पठाण' चित्रपटात दिसला. यानंतर त्याचा 'जवान' चित्रपट प्रदर्शित झाला आणि तोही ब्लॉकबस्टर ठरला आणि त्यानंतर तो 'डंकी'मध्येही दिसला. आता शाहरुख पुन्हा एकदा चित्रपटांमध्ये ॲक्टिव्ह झाला आहे, पण जेव्हा तो ब्रेकवर होता तेव्हाही तो 'आस्क मी एनीथिंग' सेशनद्वारे त्याच्या चाहत्यांशी संपर्क साधत होता.शाहरुख खानने स्वतःबद्दल सांगितले की, जेव्हा तो शूटिंग करत नसतो तेव्हा तो काहीही करत नाही.

अलीकडेच किंग खान मुंबईत झालेल्या 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट'च्या उद्घाटन समारंभाला उपस्थित होता.



# अमिषा-बिपाशात 36 चा आकडा



बॉलीवूडमध्ये 'कॅटफाईट्स'चे एक-दोन नव्हे तर अनेक किस्से आहेत. बबिता-नीतू कपूर, ऐश्वर्या राय-राणी मुखर्जी, प्रियांका चोप्रा-करीना कपूर, दीपिका पदुकोण-कतरिना कैफ, कंगना रणौत-तापसी पन्नू आणि स्वरा भास्कर अशी अनेक नावे आहेत. यापैकी एक नाव अमिषा पटेल आणि बिपाशा बासू यांचेही आहे. दोघांमध्ये ३६ चा आकडा आहे. करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' या कार्यक्रमात दोघांनीही एकमेकांवर टीका केली होती.'फिल्मी मंत्रा'ला दिलेल्या मुलाखतीत अमिषा पटेलने स्पष्ट केले की तिने कधीही कोणाशीही भांडण केले नाही. हे प्रकरण बिपाशा बासूच्या 'जिस्म' या चित्रपटाशी संबंधित आहे. बॉलीवूडमधील भांडणं 'कॉफी विथ करण' या लोकप्रिय चॅट शोशी जोडलेले आहे. या शोमध्ये सहभागी होताना बिपाशा बासू आणि अमिषा पटेल यांनी एकमेकांबद्दल अशा कमेंट केल्या की त्या एकमेकांच्या कट्टर शत्रू बनल्या. आता 'गदर' अभिनेत्री म्हणते की त्यांच्यात असे काहीही नाही. तिने या गोष्टींना केवळ अफवा म्हटलं आहे.'कॉफी विथ करण'च्या एका भागात बिपाशा बासूने केलेल्या बॉडी-शेमिंगबद्दल विचारले असता, अमिषा म्हणाली, "मी कधीही त्यावर प्रतिक्रिया दिली नाही.

# 'त्या' वक्तव्यामुळे सोनू निगम अडचणीत

बॉलीवूडच्या काही प्रसिद्ध गायकांपैकी एक म्हणजे सोनू निगम. सोनू निगमने आजवर आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केलं आहे. त्याच्या आवजाचे आज केवळ देशभरातच नव्हे तर जगभरात लाखों चाहते आहेत. आपल्या गाण्यांमुळे कायमच चर्चेत असणारा सोनू निगम त्याच्या एका वक्तव्यामुळे अडचणीत सापडला आहे. नुकत्याच झालेल्या कॉन्सर्टमध्ये एका चाहत्याने गायकाकडे कन्नड गाण्याची मागणी केली असता सोनू निगमने त्याच्या वागण्याची तुलना थेट पहलगाम हल्ल्याशी केली आणि यामुळेच सोनू निगमविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. सोनू निगमच्या नुकत्याच झालेल्या कॉन्सर्टमध्ये तो हिंदी गाणं गात असताना एका विद्यार्थ्याने 'कन्नड कन्नड' ओरडत कन्नडमध्ये गाणं गाण्याची मागणी केली. यावर सोनूने मध्येच गाणे थांबवले आणि म्हटले की, "मी माझ्या कारकिर्दीत अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहेत, परंतु मी गायलेली सर्वोत्तम गाणी कन्नडमध्ये आहेत. मी जेव्हा जेव्हा तुमच्या शहरात येतो, तेव्हा मला खूप प्रेम आणि आदर मिळतो. तुम्ही माझ्यावर कुटुंबीयांसारखे प्रेम केले आहे. पण जेव्हा माझ्या कारकिर्दीइतकंही वय नसलेलं मुलं येऊन असं वागतं तेव्हा ते वाईट वाटते." यापुढे त्याने "यामुळेच पहलगामसारख्या घटना घडतात" असंही म्हटलं.सोनू निगमने चाहत्याने त्याच्याकडे जी मागणी केली होती.

# शगुन शर्मा अमन वर्माला करतेय डेट

'क्योंकि सास भी कभी बहू थी' या लोकप्रिय मालिकेचा दुसरा सीझन २५ वर्षांनी प्रेक्षकांच्या भेटीला आला. सध्या या मालिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. या मालिकेत स्मृती इराणी पुन्हा एकदा 'तुलसी' या भूमिकेत आहे. तर हितेन तेजवानी, अमर उपाध्याय आणि इतर अनेक कलाकारही या मालिकेत त्यांची जुनी पात्रे साकारताना दिसत आहेत. या मालिकेत नकारात्मक भूमिका साकारणाऱ्या शगुन शर्माने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खुलासा केला आहे. हॉटरफ्लायला दिलेल्या मुलाखतीत शगुनने तिच्या लव्ह लाइफबद्दल सांगितलं. शगुनने प्रेमाची कबुली दिली आहे. महत्त्वाचं म्हणजे शगुन मालिकेत तिच्या धाकट्या भावाच्या भूमिकेत असलेल्या अभिनेत्याच्याच प्रेमात आहे. शगुन शर्मा तिचा सह-कलाकार अमन गांधीला डेट करत आहे. अमन 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' मध्ये शगुनच्या धाकट्या भावाची भूमिका साकारत आहे. बहीण-भावाची भूमिका साकारण्यासाठी हा शो साइन करण्यापूर्वी दोघांनी यावर चर्चा केली होती, असंही शगुनने नमूद केलं.शगुन तिच्या व अमनच्या नात्याबद्दल म्हणाली, "या अफवा नाहीत, हे खरं आहे. पण आम्ही मालिकेत काम सुरू केल्यावर डेटिंग करायला सुरुवात केली नव्हती; आम्ही त्याआधीपासून एकत्र होतो." एका पॉडकास्टमध्ये अमनने शगुनबरोबर एक वर्षापेक्षा जास्त काळापासून रिलेशनशिपमध्ये असल्याची कबुली दिली. शगुनआधी अमनची 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' मधील रितिक विरानीच्या भूमिकेसाठी निवड झाली होती. त्यानंतर शगुनला मालिका ऑफर झाली. शगुनने ऑफर आल्यावर अमनशी याबद्दल चर्चा केली होती. खऱ्या आयुष्यात बॉयफ्रेंड असलेला अमन शोमध्ये तिच्या भावाची भूमिका साकारण्यास तयार आहे की नाही, असं तिने विचारलं होतं. सुरुवातीला सेटवर कोणालाही शगुन आणि अमनच्या नात्याबद्दल माहिती नव्हती, परंतु दोन महिन्यांनंतर या जोडप्याने स्वतःच सर्वांना अधिकृतपणे सांगितलं. काही आठवड्यांपूर्वी शगुन अमनच्या पॉडकास्टमध्ये व्यक्त झाली होती. "मी इथे असण्याचं एक मोठं कारण म्हणजे हा माणूस आहे. आम्ही या मालिकेबद्दल खूप चर्चा केली होती. अमन आणि माझ्या बहिणीचं म्हणणं होतं की मी ही भूमिका करावी," असं शगुन म्हणाली होती. अमनबरोबर एकत्र काम करण्याबद्दल शगुन म्हणाली, "त्याच्या बहिणीची भूमिका पडद्यावर साकारण्याचा माझ्यावर फारसा परिणाम होत नाही. आमचे असे एकत्र सीन नसतात, ज्यात आम्ही भाऊ-बहीण आहोत, हे अधोरेखित करायचं असतं. माझी आवडती गोष्ट म्हणजे आम्हाला रोज एकत्र जेवण करायला मिळतं आणि एकत्र जास्त वेळ घालवता येतो. या मालिकेमुळे आमच्यातील मैत्री अधिक घट्ट झाली आहे."शोमध्ये शगुन नकारात्मक भूमिकेत आहे. त्यामुळे अमनला अनेकदा विचारलं जातं की तो तिला का डेट करतोय? शोमधील तिच्या भूमिकेसाठी शगुनला सोशल मीडियावरून तिला द्वेषाचा सामना करावा लागतो.



## बंगळुरू संघाने बाजी मारली

## गुजरात जायंट्सचा ३२ धावांनी पराभव

# रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची हॅट्ट्रीक!

## श्रेयांका पाटीलची दमदार गोलंदाजी







। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील ९ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना राधा यादवने ६६ धावांची दमदार खेळी केली. या खेळीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ७ गडी बाद १८२ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करताना गुजरात जायंट्सच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या गोलंदाजांसमोर गुजरात जायंट्सचा डाव १५० धावांवर आटोपला. हा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ३२ धावांनी आपल्या नावावर केला.**

या सामन्यात गुजरात जायंट्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने २० षटकांअखेर ७ गडी बाद १८२ धावा केल्या. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना सलामीला आलेल्या ग्रेस हॅरिसने १७ धावांची खेळी केली. तर राधा यादवने ४७ चेंडूंचा सामना करत ६६ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ६ चौकार आणि ३ षटकार मारले. तर ऋचा घोषने २८ चेंडूत ४४ धावा केल्या. या खेळीदरम्यान त्याने ४ चौकार आणि २ षटकार मारले.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिलेल्या १८३ धावांचा पाठलाग करताना बेथ मुनी सलामीला फलंदाजी करताना २७ धावा केल्या. तर कनिका आहुजाने १६ धावा केल्या. तर ॲशले गार्डनर अवघ्या ३ धावा करत माघारी परतली. गुजरात जायंट्सकडून फलंदाजी करताना भारती फुलमलीने एकाकी झुंज दिली. ती अवघ्या ३९ धावा करत माघारी परतली.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून गोलंदाजी करताना श्रेयांका पाटीलने दमदार गोलंदाजी केली.१८३ धावांचा बचाव करताना लॉरेन बेलने ३ गडी बाद केले. तर श्रेयांका पाटीलने सर्वाधिक ५ गडी बाद केले. तर अरुंधती रेड्डी आणि नदीन डी क्लार्कने प्रत्येकी १-१ गडी बाद केला.महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील ९ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना राधा यादवने ६६ धावांची दमदार खेळी केली. या खेळीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ७ गडी बाद १८२ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करताना गुजरात

## १८२ धावांचा डोंगर उभारला

तर अरुंधती रेड्डी आणि नदीन डी क्लार्कने प्रत्येकी १-१ गडी बाद केला.महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील ९ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना राधा यादवने ६६ धावांची दमदार खेळी केली. या खेळीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ७ गडी बाद १८२ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करताना गुजरात जायंट्सच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला.

जायंट्सच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या गोलंदाजांसमोर गुजरात जायंट्सचा डाव १५० धावांवर आटोपला. हा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ३२ धावांनी आपल्या नावावर केला. या सामन्यात गुजरात जायंट्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने २० षटकांअखेर ७ गडी बाद १८२ धावा केल्या.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना सलामीला आलेल्या ग्रेस हॅरिसने १७ धावांची खेळी केली. तर राधा यादवने ४७ चेंडूंचा सामना करत ६६ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ६ चौकार आणि ३ षटकार मारले. तर ऋचा घोषने २८ चेंडूत ४४ धावा केल्या. या खेळीदरम्यान त्याने ४ चौकार आणि २ षटकार मारले.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिलेल्या १८३ धावांचा पाठलाग करताना बेथ मुनी सलामीला फलंदाजी करताना २७ धावा केल्या. तर कनिका आहुजाने १६ धावा केल्या. तर ॲशले गार्डनर अवघ्या ३ धावा करत माघारी परतली. गुजरात जायंट्सकडून फलंदाजी करताना भारती फुलमलीने एकाकी झुंज दिली. ती अवघ्या ३९ धावा करत माघारी परतली.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून गोलंदाजी करताना श्रेयांका पाटीलने दमदार गोलंदाजी केली.१८३ धावांचा बचाव करताना लॉरेन बेलने ३ गडी बाद केले. तर श्रेयांका पाटीलने सर्वाधिक ५ गडी बाद केले.

# श्रेयस अय्यरला लॉटरी लागली!

## श्रेयस अय्यरला टीम इंडियात मिळालं स्थान; ‘हे’ 2 खेळाडू पडले बाहेर




। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. ही मालिका सध्या १-१ ने बरोबरीत आहे. ही मालिका झाल्यानंतर दोन्ही संघ ५ टी-२० सामन्यांची मालिका रंगणार आहे. आगामी आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२५ स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर ही मालिका भारतीय संघासाठी अतिशय महत्वाची ठरणार आहे. या मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात मोठा बदल करण्यात आला आहे.**

दुखापतग्रस्त झालेल्या वॉशिंग्टन सुंदर आणि तिलक वर्माच्या जागी श्रेयस अय्यर आणि रवी बिश्नोईचा संघात समावेश करण्यात आला आहे.याआधी न्यूझीलंड विरूद्धच्या टी-२० मालिकेसाठी आणि आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात वॉशिंग्टन सुंदर आणि तिलक वर्मा या दोघांनाही संधी देण्यात आली होती. पण पहिल्याच वनडे सामन्यात वॉशिंग्टन सुंदर दुखापतग्रस्त झाला, त्यामुळे त्याला वनडे मालिकेतून बाहेर

## भारतीय संघात मोठा बदल

मालिका सध्या १-१ ने बरोबरीत आहे. ही मालिका झाल्यानंतर दोन्ही संघ ५ टी-२० सामन्यांची मालिका रंगणार आहे. आगामी आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२५ स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर ही मालिका भारतीय संघासाठी अतिशय महत्वाची ठरणार आहे. या मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात मोठा बदल करण्यात आला आहे.

पडावं लागलं आहे. तसेच तो टी-२० मालिका देखील खेळताना दिसून येणार नाही. त्यामुळे त्याच्या जागी श्रेयस अय्यरचा भारतीय टी-२० संघात समावेश करण्यात आलेला आहे.

टी-२० संघात पुनरागमन करताना दिसून येणार आहे. सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), श्रेयस अय्यर (सुरूवातीच्या ३ सामन्यांसाठी), हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल (उपकर्णधार), रिंकू सिंग, जसप्रीत बुमराह, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई आणि इशान किशन (यष्टीरक्षक)

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। शनिवार ।
दि. 17 जानेवारी 2026
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## आमदार महेश लांडगे यांची भावूक प्रतिक्रिया

# भाजपाचा महाविजय स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांना समर्पित

### पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाला निर्विवाद बहुमत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आज जाहीर होत असलेल्या निकालांकडे पाहता, पिंपरी-चिंचवडकरांनी पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीवर ठाम विश्वास व्यक्त केला असून, भाजपचा एकहाती महापौर बसवण्याचा मार्ग मोकळा झाला. स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांन आम्ही साद घातली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व आणि भारतीय जनता पार्टीच्या पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली मिळालेला हा महाविजय स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांना समर्पित आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- 2026 च्या निमित्ताने राजकीय वातावरण तापले होते. मागील काही दिवसांपासून शहरात प्रचाराची जोरदार रणधुमाळी सुरू होती. आज निकालावरुन पिंपरी-चिंचवडची जाणती व स्वाभिमानी जनता भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभी राहिल्याचे स्पष्ट होत आहे.

या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला 128 पैकी 84 जागांवर विजय मिळाला आहे. प्रमुख प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला 37, शिवसेना शिंदे गटाला 6 आणि अपक्ष 1 असे संख्याबळ आहे. भाजपा आणि शिंदे गट युती झाल्यास भाजपा महायुतीने 91 जागांवर विजय मिळवल्याचे स्पष्ट होते. यावेळी बोलताना आमदार महेश लांडगे म्हणाले की, “देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे सक्षम, दूरदर्शी नेतृत्व माननीय देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवत पिंपरी-चिंचवडकरांनी भारतीय जनता पार्टीला स्पष्ट आणि निर्णायक कौल दिला आहे. हा कौल म्हणजे विकासकामांना, प्रामाणिक प्रशासनाला आणि जनहिताला दिलेली ठाम पोचपावती आहे हा विजय केवळ भारतीय जनता पार्टीचा नाही, तर हा विजय पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक स्वाभिमानी नागरिकाचा आहे.

तसेच, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप, विधान परिषद आमदार उमा खापरे, विधान परिषद आमदार अमित गोरखे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, नेते आणि मार्गदर्शक यांच्यासह भाजपा परिवारातील विविध संस्था, संघटना यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा महाविजय शक्य झाला. या विचारांच्या आणि विकासाच्या लढाईमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान दिलेल्या प्रत्येकाचा मी ऋणी आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

#### भाजपा कार्यकर्त्यांचे मानले आभार...

तसेच पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने, पदाधिकाऱ्याने आणि नेत्यांनी प्रामाणिकपणे केलेल्या मेहनतीचा हा सन्मान आहे. घराघरात जाऊन केलेला संवाद, लोकांशी निर्माण केलेला विश्वास आणि संघटनात्मक ताकदीमुळेच आज हे यश शक्य झाले आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण, नियोजित आणि शाश्वत विकासासाठी भारतीय जनता पार्टी पूर्णतः कटिबद्ध असून, नागरिकांनी दाखवलेला हा विश्वास अधिक जबाबदारीने जपला जाईल. महानगरपालिकेच्या माध्यमातून विकासकामांचा वेग वाढवून पिंपरी-चिंचवडला देशातील आदर्श शहर बनवण्याचा संकल्प भाजप निश्चितपणे पूर्ण करेल, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.

“ विकासाभिमूख हिंदुत्वाच्या मुद्यावर आम्ही ही निवडणूक लढवली. स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकर भारतीय जनता पार्टीच्या पाठिशी बहुमताने राहिला आहे. विरोधकांनी केलेल्या बिनबुडाच्या आरोपांना ही चपराक आहे. आगामी काळात शहराच्या शाश्वत विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली समर्पित भावनेतून काम करण्यासाठी मी व माझे सहकारी कटिबद्ध आहोत. या निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकर म्हणून एकजुटीने काम करण्याचे आवाहन करतो.

**-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## भारतीय जनता पक्षाने दिलेला विश्वास सार्थ ठरवला

### विकासाचे “व्हिजन” नागरिकांनी स्वीकारले - आमदार शंकर जगताप

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय जनता पक्षाने निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडली. पक्षाने दिलेला विश्वास सुज्ञ मतदारांमुळे सार्थ ठरला आहे. निवडणूक विकासाच्या विरोधात लढवली गेली मात्र नागरिकांनी विकासाचे “व्हिजन” स्वीकारले.**



भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून ही विकासाची घोडदौड आता कायम राहणार आहे. आगामी काळात नियोजन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणी अशी त्रिसूत्री वापरून शहराचा विकासाचा आलेख उंचावत नेणार असल्याची ग्वाही निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 च्या निमित्ताने संवाद साधतान निवडणूक प्रचार प्रमुख आमदार शंकर जगताप म्हणाले, 15 जानेवारी रोजी मतदान पार पडले. 16 जानेवारी रोजी या निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात आला. यामध्ये भारतीय जनता पार्टीला पिंपरी चिंचवड मधील सुज्ञ नागरिकांनी भरभरून कौल दिला आहे याबद्दल भारतीय जनता पक्ष सर्व पिंपरी चिंचवड करांचे मनःपूर्वक आभारी आहे. याबाबत शंकर जगताप म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध आहे. पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, सार्वजनिक वाहतूक, आरोग्य व शिक्षण या मूलभूत प्रश्नांवर ठोस निर्णय घेतले जातील. स्मार्ट सिटीच्या धर्तीवर शहराचा विकास करताना तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येईल. उद्योगपूरक वातावरण निर्माण करून रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष योजना राबवण्यात येणार आहेत.

शहराचा विकास करताना नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असून पारदर्शक व गतिमान प्रशासन देणे ही आमची प्राथमिकता राहील. नियोजन, व्यवस्थापन आणि प्रभावी अंमलबजावणी या त्रिसूत्रीच्या माध्यमातून पिंपरी चिंचवडचा विकासाचा वेग अधिक वाढवण्यात येईल. विरोधकांनी विकासाऐवजी नकारात्मक राजकारण केले, मात्र नागरिकांनी सकारात्मक विचार करून विकासालाच पसंती दिली, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

पिंपरी चिंचवड शहराला महाराष्ट्रातील आदर्श आणि विकसित शहर बनवण्यासाठी भारतीय जनता पक्ष सातत्याने काम करत राहील, असा विश्वासही आमदार शंकर जगताप यांनी यावेळी व्यक्त केला.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

## ॲड. अनुजा पाटील यांचा सेवाभावी उपक्रम

# अथर्वाचा वाढदिवस दृष्टिहीन मुलींमध्ये साजरा

### शिक्षण विश्व : वाढदिवसाच्या निमित्ताने समाजसेवेचा प्रेरणादायी संदेश

| पुणे||
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोथरूड येथील द पूना गर्ल्स ब्लाइंड स्कूल येथे ॲड. अनुजा पाटील यांनी आपल्या सुपुत्र चि. अथर्व याच्या वाढदिवसानिमित्त सेवाभावी उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. वाढदिवस केवळ औपचारिक साजरा न करता समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.**



या कार्यक्रमास शाळेच्या आदरणीय प्राचार्या रंका मॅडम, प्रशासकीय अधिकारी श्री. अमितजी, सामाजिक कार्यकर्त्या सविताजी, शाळेतील कर्मचारीवर्ग तसेच दृष्टिहीन विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करून कार्यक्रमास आपुलकीची व सन्मानाची किनार दिली.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनी नेत्रा, हिंदवी व कांचन यांनी सादर केलेल्या सुरेल व भावपूर्ण गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून कला, जिद्द व आत्मशक्तीचे दर्शन घडले आणि संपूर्ण वातावरण आनंदी व प्रेरणादायी झाले.

यानंतर अनुजा सुशांत पाटील ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थिनींसाठी आवश्यक अन्नधान्य व दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम मदतीपुरता मर्यादित न राहता माणुसकी, संवेदनशीलता व सामाजिक जबाबदारीचे जिवंत उदाहरण ठरला.

#### आनंदाने उपस्थितांचे मन भारावून गेले..

चि. अथर्वचा वाढदिवस दृष्टिहीन मुलींमध्ये साजरा होताना त्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य व आनंदाने उपस्थितांचे मन भारावून गेले. सेवाभावातून साजरा झालेला हा वाढदिवस अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शाळेच्या वतीने ॲड. अनुजा पाटील व अनुजा सुशांत पाटील ग्लोबल फाउंडेशनचे आभार मानण्यात आले. समाजातील दुर्बल घटकांसाठी असे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



# कोरेगाव पार्क येथील अंध शाळेत अथर्व पाटीलचा वाढदिवस सेवाभावी उपक्रमातून साजरा

### शिक्षण विश्व : ग्लोबल फाऊंडेशनच्या पुढाकारातून अन्नदान व खाऊ वाटपाचा भावस्पर्शी कार्यक्रम

| पुणे | चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**डॉ. सुशांत पाटील ग्रुप यांच्या आयोजनाखाली तसेच अनुजा सुशांत पाटील ग्लोबल फाऊंडेशन, बाणेर, पुणे यांच्या माध्यमातून कोरेगाव पार्क येथील मुलांची अंध शाळा येथे चि. अथर्व सुशांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान व खाऊ वाटपाचा अत्यंत भावस्पर्शी व आनंददायी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.**



**सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या सेवाभावी कार्यक्रमास मा. डॉ. सुशांत पाटील यांची अध्यक्षस्थानी प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. मानवी मूल्ये, सेवा, करुणा व सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थित सर्वांच्या मनाला स्पर्श करून गेला.**

**कार्यक्रमात अनुजा सुशांत पाटील ग्लोबल फाऊंडेशनचे प्रकल्प संचालक डॉ. श्रीराम चव्हाण यांनी फाऊंडेशनच्या सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी कार्याचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला. यावेळी अंध शाळेचे प्रशासकीय अधिकारी श्री. अमृत एकनाथ लोखंडे यांचा सन्मानपूर्वक परिचय करून देण्यात आला.**

**कार्यक्रमाची सुरुवात अंध शाळेचे प्राचार्य श्री. मोरे सर व प्रशासकीय अधिकारी श्री. अमृत लोखंडे सर यांच्या हस्ते मा. डॉ. सुशांत पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करून करण्यात आली. त्यानंतर अंध शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीत व देशभक्तीपर गीतांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले. विद्यार्थ्यांच्या सुरेल आवाजाने व मनापासूनच्या सादरीकरणाने उपस्थित पाहुण्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तर चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले.**

#### विधायक व प्रेरणादायी कार्यक्रम...

यानंतर चि. अथर्व सुशांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान, खाऊ व केक वाटपाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी अंध शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार, खाऊ व केकचे वाटप करण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावरील निरागस आनंद, उत्साह व हास्य पाहून उपस्थित प्रत्येकाच्या मनात समाधानाची भावना निर्माण झाली. अत्यंत प्रेमळ, आपुलकीच्या व आनंदी वातावरणात वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी प्रशासकीय अधिकारी श्री. अमृत लोखंडे यांनी सर्व मान्यवर, आयोजक, सेवाभावी संस्था व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. सेवा, संवेदना व माणुसकी यांचा सुंदर संगम असलेला हा कार्यक्रम उपस्थित सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.






Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune